क्रमांक : जमीन २६९४/१३८३/प्र.क्र. ५६२९ /ज-३
**महसूल व वन विभाग,**
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक :- १४.८.२००२.

**विषय :- जमीन - मुंबई उपनगर जिल्हा**
मौ. आंबिवली , स.नं. १४१, भूखंड क्र. ३ च्या
अभिन्यासातील भूखंड नौशाद ॲकॅडमी ऑफ
हिंदुस्थानी संगीत या संस्थेस मंजूर करणेबाबत.

**ज्ञापन :**

जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांचे पत्र क्र. सी / कार्या -३५ / जमीन / कावि -७६८ / दि.१८१२२००१ व पत्र क्र. १२ / ३-ब / एफ ०१२६ , दि.२७.५.२००२ ला अनुलक्षून विज्ञप्तीपूर्वक असे कळविण्याचे मला निदेश आहेत की, नौशाद ॲकॅडमी ऑफ हिंदुस्थानी संगीत या संस्थेस संगीत अकादमी स्थापन करणेसाठी भूखंड मंजूर करणेची संस्थेची विनंती असल्याने, मौ. आंबिवली, स.नं. १४१-अ, भूखंड क्र ३ बाबत जिल्हाधिकारी यांच्या प्रस्तावित अभिन्यासातील भूखंड क्र ३-इ मधील विकास रस्त्याच्या तळपृष्ठ निर्देशांकासह १७५२.८२ चौ.मी. क्षेत्राचा भूखंड , नौशाद ॲकॅडमी ऑफ हिंदुस्थानी संगीत या संस्थेस संगीत अकादमी स्थापन करणेसाठी शासन निर्णय, दि.३०.६.१९९२ मधील तरतुदीनुसार जमीन मंजुरीच्या आदेशाच्या दिनांकाच्या लगतपूर्व पाच वर्ष आधीच्या १ जानेवारी अस्तित्वात असलेल्या बाजारमुल्याच्या ५० % रक्कम वसूल करुन शासन ,परिपत्रक दिनांक ८.२.१९८३ मधील अटी व शर्ती आणि जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अटी तसेच खालील विशिष्ट अटीवर मंजूर करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

अटी :- १) जिल्हाधिकारी यांच्या प्रस्तावित अभिन्यासास मुंबई महानगरपालिकेची मान्यता मिळाल्यानंतरच प्रश्नाधीन भूखंडाचा संस्थेस ताबा देणेत यावा.

२) सद्या संस्थेकडून शिघ्र सिध्द गणकानुसार येणारी तात्पुरती कब्जेहक्काची रक्कम वसूल करण्यात यावी . तसेच अंतीम मुल्यांकन नगररचना व मुल्यनिर्धारण विभागाकडून निश्चित करुन त्यानुसार येणारी फरकाची रक्कम व्याजासह भरण्यास तयार असलेबाबत संस्थेकडून लेखी हमीपत्र घेण्यात यावे.

जिल्हाधिकारी ... 7 AUG 2002 ... 17763 ... 658

३.		हे ज्ञापन वित्त विभागाच्या सहमतीने ( अनौपचारिक संदर्भ क्रमांक- प्र.क्र.९३१ /०२ / व्यय-९,दिनांक- ६.८.२००२ ) निर्गमीत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(शिवाजी पाटणकर)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

प्रति,
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१

**प्रतिलिपी :-**

१) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) जमाबंदी आयुक्त, व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर (लेखा परिक्षा)
४) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य मुंबई/नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
५) सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग, मुंबई
६) कार्यासन अधिकारी ,व्यय -९ ,मंत्रालय,मुंबई -३२
७) निवडनस्ती, ज-३ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

क्रमांक : जमीन-२६९४/१३८३/प्र.क्र.५६२९/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : २० जानेवारी, २००३

विषय : <u>जमीन - मुंबई उपनगर जिल्हा</u>
<u>सामाजिक व सांस्कृतिक कार्य करणा-या संस्थांना जमीन वितरीत करताना</u>
शासन निर्णय दि. ३०/६/१९९२ च्या धोरणाऐवजी शासन निर्णय दि. ८/२/१९८३ व
११/५/१९८४ च्या धोरणाप्रमाणे किंमत आकारणेबाबत.

<u>ज्ञापन :-</u>

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास असे कळविण्याचे मला शासनाचे निदेश आहेत, की, शासकीय जमिनी देण्याबाबतच्या सर्व आदेशांचे अधिक्रमण करुन दि. ८/२/१९८३ च्या शासन निर्णयान्वये सर्वसमावेशक धोरण निश्चित करण्यात आले. तदनंतर दि. ११/५/१९८४ च्या शासन निर्णयानुसार सांस्कृतिक, सामाजिक व शैक्षणिक कार्य करणा-या संस्थांना जमीन वितरित करताना जमिनीची किंमत १/२/१९७६ च्या बाजारभावावर आधारित धरण्यात यावी, असा निर्णय घेण्यात आला. कालांतराने शासनाने शासकीय जमिनी महाविद्यालयांसाठी देताना सदर जमिनीचे मूल्य लगतपूर्व ५ वर्ष आधीच्या १ जानेवारी रोजी अस्तित्वात असलेल्या बाजारमूल्याच्या ५० टक्के घेऊन कब्जेहक्काने अथवा या रकमेवर विहित दराने भाडपट्टा आकारुन भाडपट्ट्याने देण्याबाबतचे धोरण दि. ३०/६/१९९२ च्या निर्णयान्वये निश्चित केले. उक्त दि. ३०/६/१९९२ च्या निर्णयानुसार किंमत आकारुन खाली नमूद करण्यात आलेल्या सामाजिक, सांस्कृतिक संस्थांना जमीन मंजूर करण्यात आली आहे अथवा हेतूपत्र देण्यात आले आहे.

१) नाट्यविहार कला केंद्र - दि. १८/१०/१९९६ रोजी मौजे वर्सोवा येथील सर्व्हे नं.१६१ मधील भूखंड क्र. ७ मधील जमिनीसाठी हेतूपत्र दिले आहे. प्रश्नाधिन जमीन सी.आर.झेड.मध्ये असल्याने <u>अंतिम आदेश</u> काढण्यात आलेले <u>नाहीत.</u>

२) सचिन शंकर बॅले युनिट - दि. १८/१०/१९९६ रोजी मौजे वर्सोवा येथील १६१ मधील भूखंड क्र. ५ <u>मधील जमिनीसाठी हेतूपत्र दिले आहे.</u> प्रश्नाधिन जमीन सी.आर.झेड.मध्ये असल्याने <u>अंतिम आदेश</u> काढण्यात <u>आलेले नाहीत.</u>

३) सिने आर्टिस्ट वेल्फेअर ट्रस्ट - प्रस्तुत संस्थेस मौजे वर्सोवा येथील सर्व्हे नं.१६१ मधील भूखंड क्र. ८ मधील जमिनीसाठी दि. १८/६/१९९८ रोजी हेतूपत्र देण्यात आले व दि. ५/२/१९९९ रोजी जमीन मंजूर करण्यात आली. तथापि, सदर जमीन सी.आर.झेड.मध्ये येत असल्याने संस्थेस सदर जमिनीऐवजी मौजे आंबिवली स.नं.१४१ मधील भूखंड क्र.३ च्या अभिन्यासातील भूखंड क्र. ३-अ दि. १४/८/२००२ च्या आदेशान्वये मंजूर करण्यात आला आहे.

४) नौशाद अॅकॅडमी - प्रस्तुत संस्थेस मौजे आंबिवली सर्व्हे न. १४१ मधील भूखंड क्र.३ च्या अभिन्यासातील भूखंड क्र. ३-ड शासन आदेश दि.१४/८/२००२ अन्वये मंजूर करण्यात आला आहे.

५) आचार्य जियालाल बसंत संगीत विद्यालय- प्रस्तुत संस्थेस मौजे विले-पार्ले येथील भूखंड क्र.४ शासन ज्ञापन दि. ७/४/१९९८ अन्वये मंजूर करण्यात आला आहे.

3)

उपरोक्त ५ संस्थांचे कार्य हे सांस्कृतिक, सामाजिक स्वरुपाचे असल्याने उक्त संस्थांनी त्यांना जमीन मंजूर करताना अथवा हेतुपत्र देताना शासन निर्णय दिनांक ३०/६/१९९२ च्या धोरणानुसार किंमत न आकारता शासन निर्णय दि.८/२/१९८३ व २२/५/१९८४ च्या धोरणानुसार किंमत आकारण्याची शासनास विनंती केली होती. सदर विनंतीवर शासनाने विचार केल्यानंतर असा निर्णय घेतला आहे की, दि. ३०/६/१९९२ चे धोरण हे उच्च शिक्षण / महाविद्यालयांना जमीन देण्यासाठी लागू असल्याने व वरील संस्थांचे कार्य हे सांस्कृतिक (सामाजिक प्रयोजनार्थ / नफा न मिळविणाऱ्या संस्था) असून, सदर संस्था दि. ८/२/१९८३ व दि. २२/५/१९८४ च्या धोरणात बसतात. त्यामुळे विचाराधिन संस्थांना दि. १/२/१९७६ च्या बाजारभावाच्या २५ टक्के रक्कम आकारुन कब्जेहक्काने जमीन मंजूर करण्यात यावी.

वरीलप्रमाणे शासनाने निर्णय घेतला असून, त्याप्रमाणे त्वरित कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( शिवाजी पाटणकर )
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति :
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत, बांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.

प्रतिलिपी :
१. आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
२. जमाबंदी आयुक्त व संचालक, भूमी अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे
३. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर
४. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)
५. महाध्यक्ष संचालक, नगर रचना व मूल्यनिर्धारण, मुंबई
६. वित्त विभाग व्यय-९, मंत्रालय, मुंबई - ३२.
७. निवड नस्ती, ज-२ कार्यासन, महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकिय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पूर्व) मुंबई-४०० ०५१

क्र. ०२/१४१ अ/३क/एफ-२३८
दिनांक : ४/८/२००३

**वाचले :-** १) शासन महसूल व वन विभागाचे ज्ञापन क्र. जमिन २६१४/१३८३/प्र.क्र. ५६२१/ज-३ दि. १४/८/२००२ व २०/१/२०३

२) या कार्यालयाचे समक्रमांक दि. २८/३/०३, २३/७/०३ ची पत्रे.

३) नौशाद अकाडमी ऑफ हिंदूस्थानी संगीत यांचे पत्र दि. १/४/०३

**आदेश :**

उद्दीशकेतील अ.क्र. १ कडे नमुद केलेल्या शासन ज्ञापनान्वये मौजे आंबिवली येथील स.क्र. १४१ अ मधील भूखंड क्र. ३ च्या अभिन्यासातील भूखंड क्र. ३ ड १७५२.८२ चौ.मी. क्षेत्राचा भूखंड नौशाद अँकेडमी ऑफ हिंदुस्थानी संगीत या संस्थेस संगीत अकादमी स्थापन करण्यासाठी मंजूर केला आहे. तथापि मुंबई महानगर पालिकेने मंजूर केलेल्या अभिन्यासानुसार भूखंड क्र. ३ड चे क्षेत्र १४४५.०० चौ.मी. + अतिक्ति चटई क्षेत्र ३४१.२२ चौ.मी. मिळून एकूण १७८६.२२ चौ.मी. चटई क्षेत्र असल्याने मुंबई महानगर पालिकेने मंजूर केलेल्या अभिन्यासानुसार वाढीव क्षेत्रफळासहीत प्रश्नाधिन भूखंड संस्थेस मंजूर करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

संस्थेने जमिनीचे तात्पुरते कब्जाहक्काची रक्कम रुपये १३८४६५/- (एक लाख अडोतिस हजार चरशे पासष्ट फक्त) या कार्यालयात भरणा केली आहे. जमिनीची अंतिम किमत जास्त निशिचत झाल्यास फरकाची कब्जाहक्काची रक्कम विहित व्याज दराने भरण्यास तयार असल्याबाबतचे हमीपत्र संस्थेने दिले आहे. तसेच शासनाच्या अटी/शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा संस्थेने दि. २९/७/०३ रोजी केला आहे. त्यामुळे करारनाम्याचे अटी/शर्तींना अधिन राहून प्रश्नाधिन १७८६.२२ चौ.मी. चटई क्षेत्राच भूखंड नौशाद अँकेडमी ऑफ हिदुस्थानी संगीत या संस्थेस मंजूर करण्यांत येत आहे. जमिनीचा ताबा घेण्यासाठी संस्थेने नगर भूसंपादन अधिकारी अंधेरी/तहसिलदार, अंधेरी यांच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

प्रति,

सचिव,
नौशाद अँकेडमी ऑफ हिंदुस्थानी संगीत.
आशि[illegible], कॅटर रोड, बांद्रा(प.), मुंबई - ५०

प्रतिलीपी : १) मा. प्रधान सचिव(महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -३२ यांजकडे माहितीसाठी सविनय सादर.

२) नगर भूमापन अधिकारी अंधेरी/तहसिलदार अंधेरी

२/- त्यांना कळविण्यांत येते की, प्रश्नाधिन जमिनीचा ताबा संस्थेस देऊन ताबा पावती, जमिनीचा नकाशा व सुधारित मिळकतीचा उतारा यासह पूर्तता अहवाल सादर करावा.

स्थळ प्रतिवर जिल्हाधिकारी याची सही असे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करिता.

D:\Desk IID\F-238

F- 238